# उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजना

# प्रश्नोत्तरे

| | |
|---|---|
| १ | **राज्य शासनाने उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी चे शिक्षण मोफत केले हे खरे आहे काय** ? |
| ⇨ | **होय, हे खरे आहे.**<br><br>शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थीनींनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवास धारक व वादग्रस्त महाराष्ट्र - कर्नाटक सीमा क्षेत्रातील ज्या विद्यार्थीनी विहित अटी व शर्तींची पूर्तता करतील अशा सर्व पात्र मुलींना या योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून पुढे लागू राहील.<br>पालकांचे रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या मुलींच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी चे शिक्षण मोफत केले आहे. |
| २ | **या योजनेसाठी अर्ज कोठे करावा** ? |
| ⇨ | सदर योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे (**https://mahadbt.maharashtra.gov.in**) या संकेतस्थळावरुन विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यात यावा. |
| ३ | **मुलींना मोफत शिक्षण योजना या योजनेत कोणत्या शुल्काचा समावेश आहे** ? |
| ⇨ | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमांचे वार्षिक शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क (Tuition Fee व Exam Fee) या शुल्काचा समावेश आहे.<br><br>व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शुल्क नियामक प्राधिकरण व बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेले १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल.<br><br>सदरचे शुल्क हे शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता संबंधित विद्यापीठ, तंत्रशिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ इत्यादी कडून आकारण्यात येणारे परीक्षा शुल्क व शासन मान्यता प्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे १०० टक्के मर्यादेपर्यंत परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात पात्र विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल. |
| ४ | **अर्ज भरावयाची अंतिम मुदत कोणती** ? |
| ⇨ | या बाबत वेळोवेळी स्वतंत्रपणे महाविद्यालयांना निर्देश देण्यात येतात.<br>तसेच अर्ज भरण्याबाबतचे वेळापत्रक महाडीबीटी पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येते.<br>**(https://mahadbt.maharashtra.gov.in)** |
| ५ | **या योजनेच्या लाभासाठी अर्जासोबत कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत** ? |
| ⇨ | १. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्याचा पुरावा.<br>२. अधिवास प्रमाणपत्र - सक्षम प्राधिकरणाने दिलेले |

| | |
|---|---|
| | ३. उत्पन्न प्रमाणपत्र - कुटूंबातील दोन्ही पालकांचे मागील वर्षाचे एकत्रित उत्पन्न प्रमाणपत्र. सदर प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांचे असावे.<br>४. लहान कुटुंबाचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.<br>५. अभ्यासक्रमात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र<br>६. नवीन अर्ज करतांना १० वी / १२ वी ची गुणपत्रिका आवश्यक तसेच नूतनीकरणे करीता मागील वर्षाची गुणपत्रिका आवश्यक आहे. |
| ६ | **ही कागदपत्रे कोठे उपलब्ध होतील ?** |
| ⇨ | अधिवास प्रमाणपत्र व उत्पन्न प्रमाणपत्र आपले सरकार पोर्टलद्वारे संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज केल्यास उपलब्ध होतील. (**https://aaplesarkar.mahaonline.gov.in**) |
| ७ | **ही योजना शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून लागू केली असल्याने या आधी प्रवेश घेतलेल्या व अभ्यासक्रम पूर्ण न झालेल्या पदवी अभ्यासक्रमातील मुलींना ही योजना लागू आहे का ?** |
| ⇨ | शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थीनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवास धारक व वादग्रस्त महाराष्ट्र – कर्नाटक सीमा क्षेत्रातील ज्या विद्यार्थीनी विहित अटी व शर्तीची पूर्तता करतील अशा सर्व पात्र मुलींना या योजनेचा लाभ **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पुढे लागू राहील.** |
| ८ | **माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असलेल्या / उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असलेल्या मुलींनी पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असल्यास पदविका अभ्यासक्रमासाठी सदर योजना लागू आहे का ?** |
| ⇨ | **होय.**<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ मध्ये नमुद असलेल्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना सदर योजना लागू आहे. |
| ९ | **प्रवेश घेताना मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क महाविद्यालयास भरावे लागणार आहेत का ?** |
| ⇨ | **१. शिक्षण शुल्क** – सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्या वेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात येईल. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. १९ जूलै, २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.<br>२. **परीक्षा शुल्क** – योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेली परीक्षा शुल्क लाभाची रक्कम ही थेट स्वरुपात लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात संबंधित प्रशासकीय विभागाकडून वितरीत होणार असल्याने सदरचे शुल्क महाविद्यालयास भरणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| १० | **शैक्षणिक वर्ष जून पासून सुरु झाले असल्याने यापूर्वी प्रवेश घेतलेल्या मुलींनी महाविद्यालयाकडे भरलेले शिक्षण शुल्क मुलींना परत मिळणार का** ? |
| ⇨ | **होय.**<br>सदर योजना शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थीनीनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा विद्यार्थीनीसाठी लागू असल्याने सन २०२४-२५ साठी प्रवेश घेतलेल्या मुलींच्या महाविद्यालयाकडे भरलेल्या शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात येईल. याकरीता शिक्षण शुल्क भरलेले असेल तर अर्ज करतेवेळी भरण्यात आलेले शिक्षण शुल्क नमूद करण्यात यावे. |
| ११ | **सदर योजना कायम विनाअनुदानित महाविद्यालयामधील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू आहे का** ? |
| ⇨ | **होय.**<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ मध्ये नमुद असलेल्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना सदर योजना लागू आहे. |
| १२ | **या योजनेचा लाभ कुटूंबातील किती मुलींना लागू आहे** ? |
| ⇨ | या योजनेचा लाभ कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपुरता मर्यादित आहे ? |
| १३ | **दुरस्थ अथवा अर्धवेळ स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मुलींना या योजनेचा लाभ घेता येईल** ? |
| ⇨ | **नाही.**<br>सदर योजना पूर्णवेळ अभ्यासक्रमासाठी मागील सत्रातील किमान ५० टक्के उपस्थितीची अट पूर्ण करणाऱ्या मुलींना लागू आहे. |
| १४ | **या योजनेच्या लाभासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे का** ? |
| ⇨ | **होय.**<br>महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षियत वितरण) अधिनियम २०१६ अन्वये दिनांक १३.०४.२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द केलेली अधिसूचना (असाधारण क्रमांक ८७) व दि. १५.०४.२०१७ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार ऑनलाईन अर्जासोबत पात्र इच्छुक अर्जदारांनी त्यांचा आधार क्रमांक देणे आवश्यक आहे.<br>तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त करुन घ्यावयाची आहे असे खाते ऑनलाईन अर्जासोबत दिलेल्या आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. |
| १५ | **सदर योजना कोणत्या प्रवर्गासाठी लागू आहे** ? |
| ⇨ | सदर योजना आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्गातील (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील पात्र मुलींना लागू आहे. |
| १६ | **ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींबाबत कोणाशी संपर्क करावा** ? |

| | |
|---|---|
| ⇨ | १. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/ नोडल अधिकारी.<br>२. संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयातील शिष्यवृत्तीचे काम पाहणारे नोडल अधिकारी / कर्मचारी.<br>३. MahaIT च्या महाडीबीटी पोर्टलवरील "Grievance Section" मध्ये अडचणींची नोंद करावी. |
| **१७** | **योजनेबाबतची सखोल माहिती / मार्गदर्शक तत्वे कोठे पाहावयास मिळतील** ? |
| ⇨ | १. महाडीबीटी पोर्टल (https://mahadbt.maharashtra.gov.in)<br>२. उच्च शिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ https://dhepune.gov.in<br>३. तंत्र शिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ https://www.dtemaharashtra.gov.in<br>४. कला संचालनालयाचे https://doa.maharashtra.gov.in<br>वरील अधिकृत संकेतस्थळावर या योजनेची संपूर्ण माहिती माहिती नमूद आहे. |
| **१८** | **विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करते वेळी पूर्वतयारी म्हणून कोणत्या बाबी आवश्यक आहेत** ? |
| ⇨ | १.आधार संलग्नित बँक खाते<br>२.महाविद्यालयांची प्रवेश पावती (Scanned Copy)<br>३. अधिवास प्रमाणपत्र.<br>४. उत्पन्न दाखला. |
| **१९** | **अर्जाची पडताळणी कशा प्रकारे केली जाते** ? |
| ⇨ | अर्जदाराने महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छाननी खालील ३ स्तरावर करण्यात येते.<br>१. महाविद्यालय स्तर<br>२. विभाग स्तर<br>३. संचालनालय (राज्य स्तर) |
| **२०** | **अर्ज भरतेवेळी काही त्रुटी असल्यास किंवा चुकीचा भरला गेल्यास अर्ज जमा केल्यानंतर अर्जाची दुरुस्ती कशी करता येते का** ? |
| ⇨ | **होय.**<br>ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यात दुरुस्ती करावयाची झाल्यास संबंधित महाविद्यालयाशी संपर्क करुन आवेदनपत्र कोणत्या स्तरावर आहे याबाबत पाहणी करुन दुरुस्तीस संधी देण्यात येते. तथापि राज्यस्तरावरुन अर्ज नामंजूर होण्यापूर्वीच विहित मुदतीत सदर बदल करण्याची सुविधा आहे. |
| **२१** | **विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली किंवा कसे याबाबतची माहिती कशी समजू शकेल** ? |
| ⇨ | आवेदनपत्र सादर करतेवेळी विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा User Id व Password उपलब्ध होतो, याआधारे शिष्यवृत्ती अर्जावर होत असलेली कार्यवाही विद्यार्थ्यास ऑनलाईन दिसून येते. |
| **२२** | **मंजूर शिष्यवृत्ती किती टप्प्यात बँक खात्यात जमा केली जाते** ? |
| ⇨ | मंजूर शिष्यवृत्ती सत्र निहाय दोन टप्प्यात बँक खात्यात जमा केली जाते. |
| **२३** | **या योजने अंतर्गत लाभ प्राप्त करण्याकरिता केवळ CAP मार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशीत विद्यार्थीनी पात्र आहेत काय** ? |

| | |
|---|---|
| ⇨ | **होय.**<br>व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता दरवर्षी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (Centralized Admission Process - CAP) मार्फतच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनींकरिता ही योजना लागू आहे. |
| २४ | **इतर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थीनी या योजनेचा लाभ घेऊ शकतात का ?** |
| ⇨ | **नाही.**<br>शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ **कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ** मिळण्यास संबंधित विद्यार्थीनी पात्र असेल. |
| २५ | **सदरहू योजना कोणास लागू नाही.** |
| ⇨ | खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे यामध्ये प्रवेशित विद्यार्थीनी तसेच व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश घेणाऱ्या मुलींना सदरहू योजना लागू नाही. |
| २६ | **काही विभागाकडून योजनेचा लाभ उशिरा मिळत असल्याने संस्थांना काही ठराविक रक्कम (Advoc Advance) म्हणून देता येणार का ?** |
| ⇨ | प्रत्येक वर्षी अर्ज भरण्यासाठी डीबीटी पोर्टल ऑक्टोंबर/ नोव्हेंबर मध्ये सुरु करण्यात येत होते, यावर्षी जूलै/ ऑगस्ट मध्ये सुरु होत असल्याने, विद्यार्थ्यांनी योजनेच्या लाभासाठीचा अर्ज लवकर भरुन संस्थेने त्यांचे स्तरावर प्रलंबित न ठेवता तात्काळ निकाली काढल्यास लाभ लवकर देता येईल. |
| २७ | **मला Caste Validity किंवा इतर कागदपत्रे प्राप्त होण्यास काही दिवस लागणार आहेत तरी मला डीबीटी पोर्टलद्वारे योजनेचा लाभ मिळू शकेल का ?** |
| ⇨ | यावर्षी डीबीटी पोर्टल जूलै/ ऑगस्ट मध्ये सुरु होत असल्याने, विद्यार्थ्यांना योजनेच्या लाभासाठीचे अर्ज भरण्यासाठी ७/८ महिने उपलब्ध होतात. त्या कालावधीत विद्यार्थ्यांनी योजनेच्या लाभासाठी संपूर्ण अर्ज भरावा. |
| २८ | **योजनेनुसार मला मागील वर्षात शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के लाभ मिळालेला आहे. आता मला शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शिकत असलेल्या अभ्यासक्रमासाठी १०० टक्के शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा लाभ मिळणार का ?** |
| ⇨ | **होय.**<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शिकत असलेल्या अभ्यासक्रमांसाठी पात्र मुलींना १०० टक्के शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा लाभ मिळणार आहे. |
| २९ | **योजनेनुसार मला मागील वर्षात शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के लाभ मिळालेला आहे. मागील वर्षाचे उर्वरित शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क मला संस्थेमध्ये भरावे लागणार का ?** |
| ⇨ | **होय.**<br>मागील वर्षापर्यंत आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्गातील (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील व्यावसायिक |

| | |
|---|---|
| | अभ्यासक्रमांना प्रवेशित मुलींना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्के लाभ लागू होता. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर प्रवर्गाच्या मुलींना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा १०० टक्के लाभ देण्यात येणार असल्याने, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून संस्थेमध्ये भरावे लागणार नाही. |
| **३०** | **मी योजनेच्या लाभासाठी अर्ज केला आहे, पण योजनेचा लाभ मला उशिराने मिळतो तरी तो लवकर मिळू शकतो का ?** |
| ⇨ | यावर्षी डीबीटी पोर्टल जूलै/ ऑगस्ट मध्ये सुरु होत असल्याने, विद्यार्थ्यांना योजनेच्या लाभासाठीचे अर्ज भरण्यासाठी ७/८ महिने उपलब्ध होतात. या कालावधीत विद्यार्थ्यांने योजनेच्या लाभासाठीचा अर्ज शेवटच्या तारखेची वाट न बघता लवकरात लवकर अर्ज भरल्यास आणि विद्यार्थी शिकत असलेल्या संस्थेने लवकरात लवकर अर्ज मंजूर केल्यास लाभ लवकर मिळतो. |
| **३१** | **मी शिक्षण घेत असलेल्या अभ्यासक्रमांमध्ये दोन वेळा पूर्णपणे अनुत्तीर्ण झाले आहे, तरी मला या योजनेचा लाभ घेता येतो का ?** |
| ⇨ | **नाही.**<br>संपूर्ण अभ्यासक्रमामध्ये दोन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा अनुत्तीर्ण झाल्यास (खंड पडल्यास) पुढील वर्षापासून सदर योजनेचा लाभ घेता येत नाही. |
| **३२** | **मी शिक्षण मध्येच सोडले आहे. तरी सदर योजनेमुळे शिक्षण शुल्क माफ असल्याने मी पुन्हा शिक्षणासाठी सदर योजनेचा लाभ घेऊ शकेन का ?** |
| ⇨ | **होय.**<br>जर विहीत मार्गाने अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास व योजनेच्या अटी व शर्तींची पूर्तता करत असल्यास योजनेचा लाभ घेऊ शकता. |
| **३३** | **इतर मागास प्रवर्गातील (OBC) विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कोणता विभाग देणार ?** |
| ⇨ | इतर मागास बहुजन कल्याण विभागाद्वारे योजनाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. |
| **३४** | **काही संस्थाकडून योजनेच्या लाभासाठी पात्र असलेल्या मुलींकडून देखील शैक्षणिक शुल्क भरण्याबाबत कळविण्यात येत आहे ?** |
| ⇨ | पात्र मुलींना शासनाच्या लागू असलेल्या योजनांचा शैक्षणिक शुल्काचा लाभ शासनाकडून देण्यात येणार असल्याने संस्थांनी मुलींकडून शैक्षणिक शुल्काची रक्कम न घेण्याबाबतचे परिपत्रक दि. १९ जूलै, २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. |
| **३५** | **शासनाच्या या निर्णयामुळे विद्यार्थी शासकीय संस्थांकडे पाठ फिरवतील की काय ? हा निर्णय फक्त खाजगी महाविद्यालयांच्या हिताचा आहे काय ?** |
| ⇨ | शासकीय व शासन अनुदानित स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमार्फत अत्यंत गुणात्मक व उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाते (उदा. COEP, VJTI, WCoE, SGGS, इत्यादी). यामुळे शासनाच्या या निर्णयामुळे विद्यार्थी शासकीय संस्थांकडे पाठ फिरवतील असे वाटत नाही. शासनाचा हा निर्णय आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्गातील (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील विद्यार्थिनींकरिता हिताचा आहे. |

---------------------

**प्रश्न क्र. ३६:  शासकीय व शासन अनुदानित स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये यांमध्ये शैक्षणिक शुल्क कमी का आहे? सदर शुल्क या योजने अंतर्गत माफ आहे का** ?

**उत्तर:** होय,  शासकीय व शासन अनुदानित स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांना शासनामार्फत अनुदान देण्यात येत आहे यामुळे शिक्षण शुल्क कमी आहे.

**प्रश्न क्र. ३७: या योजने अंतर्गत लाभ प्राप्त करण्याकरिता अर्ज करण्याचे वेळापत्रक काय आहे?**
**उत्तर:** दरवर्षी शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू होत असतांना व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जुलै/ ऑगस्ट महिन्यांमध्ये DBT पोर्टल वर अर्ज भरण्याकरिता सुरवात होते व या करिता पुढील वर्षातील जून महिन्यामध्ये त्या त्या वर्षाची नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया समाप्त होते.

Government of Maharashtra
Maharashtra State, India

# FAQ Document (English)

1. Is it true that the state government has made the education of degrees, diploma and post-graduate degrees free of charge for girls pursuing higher education?

   Ans: Yes, it is true.

   This scheme is open to all eligible girls who have taken admission in the academic year 2024-25 and before and are currently studying in various academic sessions, domicile holders of Maharashtra and students from the disputed Maharashtra Karnataka border area who fulfill the prescribed terms and conditions.

   The benefit will be applicable from the academic year 2024-25 onwards. Education of girls with annual income of 8.00 lakhs or below is made tuition fee and exam fee free of charge for degree, diploma and post graduate education.

2. Where to apply for this scheme?

   Ans:

   Application for the said scheme should be made online through the MahaDBT portal (https://mahadbt.maharashtra.gov.in) within the prescribed time limit.

3. What fees are included in this free education scheme for girls?

   Ans:

   The annual education fee and examination fee (Tuition Fee and Exam Fee) of the enrolled courses are included.

   Scholarship will be given up to 100 percent of the tuition fees as determined by the Fee Regulatory Authority for professional courses and the competent authority for non-professional courses.

4. What is the deadline for submission of application?

   Ans:

   Instructions are given to independent colleges in this regard from time to time. Also, the schedule for filling the application form is published on the MahaDBT portal. (https://mahadbt.maharashtra.gov.in)

5. What documents are required along with the application for the benefit of this scheme?

   Ans:
   - Proof of admission to the course.
   - Domicile certificate issued by competent authority
   - Income Certificate Combined income certificate of previous year of both the parents of the family. The said certificate should be at least from the concerned Tehsildar or competent authority.
   - Self-declared certificate of small family.
   - Block certificate if there is block in the course

6. Where will these documents be available?

   Ans:

   Domicile certificate and income certificate will be available by applying to the concerned authority through your state government portal. (https://aaplesarkar.mahaonline.gov.in)

7. Since this scheme has been implemented from the academic year 2024-25, is this scheme applicable to the girls who are enrolled in this year and who have not completed the course?

   Ans:

   All eligible girls who are enrolled in the academic year 2024-25 and before and are currently studying in various academic sessions, domicile holders of Maharashtra and students from the disputed Maharashtra Karnataka border area who fulfill the prescribed terms and conditions will benefit from this scheme for the academic year 2024-25

8. Is the scheme applicable for diploma course if girls who have passed secondary school examination / passed higher secondary school examination have taken admission in diploma course?

   Ans: Yes

   Department of Higher and Technical Education, Maharashtra Government Decision dt. 7/10/2017 The scheme is applicable to Diploma, Degree, Post Graduate courses offered.

9. Do girls have to pay tuition fees and examination fees to the college while taking admission?

   Ans:
   - They will be admitted without charging any tuition fee at the time of admission. The instructions are given by the higher and technical department in the circular dated 19th July 2024.

- The amount will directly be credited to the beneficiary's Aadhaar linked bank account from the concerned Govt. Authority hence it is mandatory for the candidates to pay the examination fees to the college.

10. As the academic year started from June, the girls who had previously admitted to the college, Will the girls get refund the paid tuition fees?

    Ans: Yes

    The said scheme is for the students enrolled in the academic year 2024-25 and earlier and, currently Admission for the year 2024-25 as applicable to students studying in different academic sessions. The tuition fees paid to the girl's college will be reimbursed. For this, if tuition fee has been paid then the tuition fee paid should be mentioned at the time of submitting the scheme application.

11. The scheme is open to vocational and non-vocational courses in unaided universities.

    Ans: Yes

    This scheme is applicable to all the courses mentioned in the Government decision given dt 7/10/2017 of Higher and Technical department.

12. The benefit of this scheme is applicable to how many girls in the family?

    Ans:

    The benefit of the scheme is only applicable for 2 girls in the family.

13. Girls admitted for remote or part-time courses can avail the scheme?

    Ans:

    NO. The scheme is applicable for the full-time programme only. The scheme requires a minimum of 50 percent attendance in the previous semester.

14. Is Aadhaar required for the benefit of this scheme?

    Ans:

    Yes, Maharashtra Aadhaar (Limited Delivery of Financial and Other Assistance, Benefits and Services) Act, 2016, Also vide notification dated 13.04.2017 published in the Gazette (Extraordinary Karma No. 87) and Eligible with online application as per provision of Govt Decision dated 15.04.2017,
    Applicants are required to provide their supporting documents (Aadhar Number)

15. For which Subcategory is the scheme applicable?

    Ans:

    The scheme covers girls belonging to Economically Backward (EBC), Economically Weaker Section (EWS), Other Backward (OBC), Socially and Educationally Backward Classes (SEBC).

16. Whom should I contact regarding the difficulties faced while filling the online form?

    Ans:
    - Principal/ Nodal Officer of the concerned University.
    - Nodal Officer /employee of the concerned department.
    - Grievances should be mentioned in the "Grievance Section" on the MahaDBT portal of MahaIT.

17. Where can I find detailed information / guidelines about the scheme?

    Ans:
    - MahaDBT Portal (https://mahadbt.maharashtra.gov.in)
    - Directorate of Higher Education website (https://dhepune.gov.in)
    - Directorate of Technical Education website https://www.dtemaharashtra.gov.in)
    - Directorate of Arts (https://doa.maharashtra.gov.in)

    The complete details of this scheme are mentioned on the official link above

18. What essentials are required in advance while filling the application form for the scheme?

    Ans:
    - Aadhaar linked bank account
    - University Admission Receipt (Scanned Copy)
    - Domicile Certificate
    - Income certificate of previous year.

19. How will candidates' application will be verified?

    Ans:

    Scrutiny of Applicants filled online in MahaDBT portals will be done at following 3 levels.
    - Collage/University Level
    - Zonal/Regional Office Level
    - Directorate Level( State Level)

20. If there is any error while filling or if it is filled wrongly then after submitting it, can

candidates change it?

Ans: Yes

In case of any mistake after filling the online application, contact the concerned university/college. In this case, College shall send back the application to students.
An opportunity is given to edit mistakes by checking the level of the application. However, there is a facility to make the said change within the period specified above before further disapproval from the State Government.

21. How can students find out if a scholarship has been approved and how?

    Ans:

    Student Scholarship User Id and Password are available at the time of submission of application form. Students can view the status online.

22. How much is the sanctioned scholarship deposited into the bank account?

    Ans:

    The approved scholarship is credited to the aadhar seeded bank account in two installments.

23. Which candidates are eligible under the scheme?

    Ans:

    Only candidates taking admissions through CAP round and student's family income is below 8 Lakhs are eligible under the scheme.

24. Can students availing other scholarship schemes, avail this scheme?

    Ans: No

    To get benefit only under any one scheme out of various scholarship schemes of Govt.

25. Who cannot avail the scheme?

    Ans:
    The students got admission in Non-CAP at Institute Level, in private university are not eligible for the scheme.

26. Due to delayed benefit of the scheme by some departments, certain amount to the institutions can it be given as (Advoc Advance)?

    Ans: In the previous year the DBT portal was supposed to be launched in October/November. This year for payment of annual arrears. As it starts in July/August,

students should fill the form early in order to get the benefits of the scheme and the organization will also do the same.

27. Although it will take few days for me to receive Caste Validity and other documents, can I get the benefit of DBT Portal Scheme?

    Ans:

    As the DBT portal starts in July/August this year, the students will be eligible for the benefits of the scheme. Students have at least 7/8 months available for filling the application forms. During that period the students must complete their application to get the benefit of the scheme.

28. According to the scheme, I got 50 percent benefit of previous year education fee and examination fee. Now I need 100 % benefit from academic year 2024-25.Will I get the benefit?

    Ans: Yes
    The Girl students from academic year 2024-25 will get 100% fee waiver of Tuition Fee and Exam Fee.

29. According to the scheme, I have got 50% benefit of education fee and exam fee in the previous year. Do I have to pay the remaining academic fees and examination fees of the previous year to the institute?

    Ans: Yes,

    Professionals belonging to Economically Backward (EBC), Economically Weaker Sections (EWS), Other Backward Classes (OBC), Socially and Educationally

    Backward Classes (SEBC) till last year 50% benefit of tuition fee and examination fee is applicable to girls admitted to the courses. As 100% benefit of education fee and examination fee will be given to the girls of the said category from the academic year 2024-25, they will not have to pay to the institution from the academic year 2024-25.

30. I have applied for the benefit of the scheme, but I am getting the benefit of the scheme late, Can I get it early?

    Ans:

    As the DBT portal starts in July/August this year, the students will be eligible for the benefits of the scheme, 7/8 months available for filling. During this period, the students have to apply for the scheme. Students are advice to apply or re-apply as soon as possible without waiting for the last date. The sooner the institutions approves the application, the sooner the benefits

will be available.

31. Even if I have failed twice in the courses I am pursuing, can I avail this scheme?

Ans:

NO. If you fail two or more times in the entire course (failure), you will not be able to avail the scheme from the next year.

32. If the applicant drops out the education midway. However, since the education fee is waived due to the said scheme, will I be able to avail the said scheme again for education?

Ans: Yes
You can avail the benefits of the scheme if you enroll in the course through the prescribed route and fulfill the terms and conditions of the scheme.

33. Which department will provide the scholarship for Other Backward Class (OBC) students?

Ans:

The scheme will be implemented in Other Backward Bahujan Welfare Department.

34. Should institutes charge fees from the eligible girls?

Ans:

Eligible girls will be given the benefit of education fee of applicable government schemes by the government; Therefore, the institutions should not collect education fees from girls from July 19, 2024.

35. What is the application schedule for availing benefits under this scheme?

Ans:

Every year when the academic course starts and after the admission process is completed, the application process starts in the months of July / August on the DBT portal and for this the process of accepting new applications for that year ends in the month of March.

36. What are the Type of departments?

a) Higher and Technical Education Department (EBC/EWS) (Only General Category Students)

b) Other Backward Bhaujan Welfare Department (OBC/ VJNT) (ALL Students studying in professional courses like engineering/ medical/ law/ Agri./ etc.)

c) Social Justice and Special Assistance Department (SC) (ALL Students studying in professional courses like engineering/ medical/ law/ Agri./ etc.)

d) Tribal Development Department(ST)

e) Agriculture, dairy development, Animal Husbandry and Fisheries Department (EBC/EWS) (Only for Agriculture Professional Courses Students)

f) DMER (EWS/EBC) (Only Medical and Nursing students)

g) Planning Department (Sarthi) (SEBC students admitted in professional courses)

37. Categories eligible for the scheme?

a) Economically Weaker Sections(EWS),

b) Socially and Educationally Backward Classes(SEBC)

c) Other Backward Classes (OBC) categories

d) SC/ST

38. Is Open category with NCL eligible for this scheme?

Open category students under EBC or EWS is eligible.

39. Is SC/ST category with NCL eligible for this scheme?

NCL is not necessary for SC/ST students.

40. Is OBC/SEBC category candidate who doesn’t possess NCL certificate. is she eligible?

If students belong to OBC/SEBC and doesn’t have NCL then these students are not eligible for the scheme.

41. Do we need to validate eligibility criteria? Like certificates etc.

Students are supposed to fill an application on DBT portal with relevant documents (Scanned copies to be uploaded)→ Institute’s clerk scrutinize the same and forward to Principal→ Principal will approve the application and forward the same to Joint Director→Joint Director of the region further scrutinize the same and finally submit the same to Directorate for Payment purpose.

In this process, in case if application is incomplete, it will be reverted back to students by Institute OR to Institute by Joint Director. It is Students and Institute's responsibility to complete the application and re-submit the same immediately. Delay from Students OR Institutes side will affect in disbursement of scholarship.

42. What is the criteria for "Maharashtra Domicile"?

    Ans: He/she should have born in Maharashtra State and/or is having stay 15 years or more in Maharashtra State.

43. Is this scheme valid for Orphan students (Male & Female)?

    Yes. Irrespective of Gender.

44. Will the students get refund of their examination fees & seat confirmation which they have paid for CET?

    NO

45. Which category of students have to pay only 50% of their fees?

    Eligible Male students.

46. Candidates under this scheme will have to pay ATKT fees or Not?

    All types of Exam Fee are applicable.